classmate Date 8/7/2013 Page

# 1. समग्रलक्षी अर्थशास्त्राची ओळख [Introduction]

* प्रस्तावना :-

फार वर्षापूर्वी अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्र म्हणून मानले जात नव्हते. राज्यशास्त्र, मानसशास्त्र समाजशास्त्र, तर्कशास्त्र या शास्त्राची एक शाखा अथवा एक भाग म्हणून या शास्त्राची ओळख होती, परंतु ॲडम स्मिथ, डॉ. मार्शल, रॉबिन्स यांनी अर्थशास्त्राला स्वतंत्र असे मानाचे स्थान मिळवुन दिले म्हणून अर्थशास्त्र हे स्वतंत्र शास्त्र म्हणून ओळखले जाउ लागले. पुढे अर्थशास्त्राचे दोन भाग झाले ते म्हणजे - ① अंशलक्षी अर्थशास्त्र / सुक्ष्म ② समग्रलक्षी अर्थशास्त्र / स्थूल अर्थशास्त्र

सर्व प्रथम सन 1933 मध्ये ऑस्लो विद्यापीठांतील अर्थतज्ञ प्रा. रॅग्नार फ्रिश यांनी वरील दोन संकल्पना वापरल्या नंतरच्या काळात या संज्ञाच्या विकास करण्याचे काम आधुनिक अर्थशास्त्राचा जनक प्रा. लॉर्ड, जॉन मेनार्ड केन्स यांनी आपल्या ग्रंथातून केले आहे.

सुक्ष्मलक्षी अर्थशास्त्राला इंग्रजीत Micro Economics असे म्हणतात. हा शब्द Mikros या ग्रीक शब्दांपासून निर्माण झाला. आणि या शब्दांचा अर्थ लहान असा होतो. एका विशिष्ट घटकांवर लक्ष केंद्रीत करणारे हे शास्त्र आहे. उदा. एक ग्राहक, एक विक्रेता, एका वस्तुची किंमत इ. सुक्ष्मलक्षी अर्थशास्त्रांचा जनक ॲडम स्मिथ याला ओळखले जाते.

* समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अर्थ :-

समग्रलक्षी अर्थशास्त्राला इंग्रजीत Macro Economics असे म्हणतात Macro हा Makros या ग्रीक शब्दांपासून तयार झाला आहे. Makros या शब्दांचा अर्थ मोठा असा होतो. म्हणून त्याला मराठीत स्थूल / समग्र / समिष्ठ / सांकालिक अथवा समदर्शी अर्थशास्त्र असे म्हणतात.

स्थूल अर्थशास्त्राचा जनक म्हणून रॉबर्ट, थॉमस

माल्थस हा जरी असला तरी हे शास्त्र विकसित करण्यांचे काम अर्थशास्त्रज्ञ केन्स याला जाते. स्थूल अर्थशास्त्रात एकूण अर्थव्यवस्थेचा विचार केला जातो. वस्तुच्या किंवा समूहांच्या घटकांचा अभ्यास या शास्त्रात केला जातो. उदा. एकूण मागणी, एकूण पुरवठा, एकूण बचत, एकूण भांडवल, एकूण उत्पादन इ.

2013 Act.
व्याख्या :-

① प्रा. जे. एल. कालबर्टसन यांच्यामते :-

" ज्या अर्थशास्त्रात उत्पन्न, रोजगार, किंमत, पैसा यांचा समावेश असतो, त्यांस समग्रलक्षी अर्थशास्त्र असे म्हणतात

② प्रा. बोल्डींग यांच्यामते :-

" समग्रलक्षी अर्थशास्त्र म्हणजे जे शास्त्र वैयक्तीक घटकांऐवजी सामूहीक घटकांचा विचार करते, व्यक्तीगत उत्पन्ना ऐवजी, राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार करते, व्यक्तीगत किंमती ऐवजी सर्व साधारण किंमत पातळीचा विचार करते, तसेच वैयक्तीक उत्पादनांऐवजी राष्ट्रीय उत्पादनाचा विचार करते त्या शास्त्राला समग्रलक्षी अर्थशास्त्र म्हणतात."

या प्रकारच्या व्याख्या समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या केल्या जातात. थोडक्यात हे शास्त्र एका विशिष्ट घटकांशी संबंधीत नसून संपूर्ण आर्थिक प्रणालीशी संबंधीत आहे.

2013 2011 16 M
* समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व :-

① संपूर्ण अर्थव्यवस्थेचे यथार्थ ज्ञान मिळते :-

अर्थव्यवस्थेत अनेक आर्थिक समस्या असतात. जसे की - राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, सामान्य किंमत पातळी, तेजी-मंदी, इ. या सर्व बाबींचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात केला जातो. अर्थव्यवस्थेतील अनेक घटकांची माहिती या शास्त्रांतून समजते म्हणून त्याला महत्त्व आहे.

② आर्थिक धोरण ठरविण्यांस उपयुक्त :-
आर्थिक धोरणांच्या संबंध व्यक्तीशी नसून संपूर्ण समाजाशी आहे. आणि हे शास्त्र संपूर्ण समाजयांच्याच अभ्यास करीत असल्याने शासनाला आपले आर्थिक धोरण ठरवताना समग्रलक्षी विश्लेषण उपयोगी ठरते. व त्यानुसार शासन व्यापारासाठी व्यापारविषयक धोरण पैशांच्या पुरवठ्यांबाबत चलनविषयक धोरण, करांसाठी करविषयक धोरण ठरविते म्हणून या शास्त्राला महत्त्व आहे.

③ आर्थिक सामर्थ्य वाढीच्या प्रेरणा मिळतात :-
समग्रलक्षी अर्थशास्त्रामुळे आर्थिक सामर्थ्य वाढीच्या प्रेरणा मिळतात. राष्ट्रांचे सामर्थ्य लष्करीबळांत नसून आर्थिक विकासात आहे. हे या शास्त्रांमुळे समजते.

④ पैशांच्या मुल्य निश्चीतीत महत्त्वाचे योगदान :-
पैशांच्या मुल्य निश्चीतीबाबत मांडलेला चलन संख्यामान सिद्दांत या शास्त्राशी संबंधीत आहे. पैशांच्या चलन संख्येत सतत बदल होत असतात, त्यांचा पैशांच्या मुल्यांवर / किंमतीवर विपरीत परिणाम होतो. त्यांच्या अभ्यास या शास्त्रांमुळे करणे सोपे जाते. म्हणून त्यांस महत्त्व आहे.

⑤ गतिमान जगात स्थूल अर्थशास्त्र मार्गदर्शक ठरते :-
आजचे युग गतिमान बनले आहे. जगातील बहुतेक अर्थव्यवस्था गतिमान बनल्यांमुळे सतत काहींना काही परिवर्तने होतात. त्यातून नवीन आर्थिक प्रश्न निर्माण होतात. असे प्रश्न सोडविण्यासाठी स्थूल अर्थशास्त्र मार्गदर्शक ठरते म्हणून त्याला महत्त्व आहे.

⑥ आर्थिक समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त :-
अर्थव्यवस्थेतील विविध आर्थिक समस्यांचे स्पष्टीकरण स्थूल अर्थशास्त्राद्वारे समजते. उदा. बेकारी, चलनवाढ

आर्थिक मंदी, वाढती लोकसंख्या इ. या राष्ट्रीय समस्या सोडविण्यासाठी हे शास्त्र उपयुक्त ठरते.

7) आर्थिक विकास योजना व त्यांच्या उपाय योजनेस उपयुक्त
सरकारला अर्थव्यवस्थेच्या विकास घडविण्यासाठी विविध योजना आखाव्या लागतात. उदा. शेती विकास घडविणे, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे यासारख्या योजनांच्या आखणीसाठी व राबविण्यासाठी स्थूल अर्थशास्त्राचा उपयोग होतो.

8) राष्ट्रीय उत्पन्नांचा अभ्यास
राष्ट्रीय उत्पन्नांचा अभ्यास हा स्थूल अर्थशास्त्राच्या आत्मा आहे. स्थूल अर्थशास्त्राच्या साहाय्याने देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नांची माहिती समजते. शिवाय भविष्यातील आर्थिक घडामोडींचा अंदाज घेण्यासाठी या शास्त्राचा उपयोग होतो. म्हणून त्यास महत्त्व आहे.

9) सुक्ष्म अर्थशास्त्रांच्या अभ्यासासाठी उपयुक्त :-
सुक्ष्म अर्थशास्त्राच्या उभारणीसाठी व विकासांसाठी स्थूल अर्थशास्त्रांचा उपयोग होतो. अर्थव्यवस्थेतील विशिष्ट घटकांचा स्वतंत्रपणे अभ्यास सुक्ष्म अर्थशास्त्रात केला जातो. परंतु तेच घटक एकत्रीत अभ्यास त्यांचे वर्तन हे वैयक्तीक वर्तनांपेक्षा वेगळे असते. अशा एकत्रीत वर्तनांच्या यथार्थ ज्ञानांसाठी स्थूल अर्थशास्त्रांचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

वरील सर्व घटकांवरून असे स्पष्ट होते की अर्थव्यवस्थेत स्थूल अर्थशास्त्राला महत्त्व आहे.

2012 * स्थूल अर्थशास्त्रांचे स्वरूप :-
स्थूल अर्थशास्त्राचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येतील :-

① समुच्चयात्मक दृष्टीकोन :-

समग्रलक्षी अर्थशास्त्रात रोज असंख्य घटकांची निर्मिती होते. अनेक वैयक्तीक निर्णय रोजच्या-रोज घेतले जातात. यांतील प्रत्येक निर्णय स्वतंत्रपणे तपासणे शक्य नसते म्हणून बेरजांच्या स्वरूपातील समुच्चय विचारात घेऊन हे शास्त्र अभ्यास करते असे त्यांच्या स्वरूप आहे.

उदा. रोजगार - अर्थव्यवस्थेतील रोजगार हा एका व्यक्तींचा रोजगार विचार घेतला जात नाही तर संपूर्ण देशांतील एकूण रोजगार विचारात घेतला जातो तसेच एकूण मागणीच्या स्वरूपात एकूण पुरवठा, एकूण किंमत पातळी यांच्या संबंधात आहे.

② पैशांत अभिव्यक्त :-

देशांतील वस्तू व सेवांची एकत्रीत बेरीज करणे कठिण असते. उदा. वीज पुरवठा, संगणक, दुध, मोलकरणीची सेवा, बूट व चप्पल इ. अशावेळी या वस्तुच्या किंमती विचारात घेऊन त्यांची बेरीज केली जाते. समग्रलक्षी अर्थशास्त्र या किंमती पैशांत व्यक्त करते असे त्यांचे स्वरूप आहे.

③ मागणी व पुरवठा यांच्यात सुक्त संबंध :-

मागणी व पुरवठ्यांतील सुक्त संबंध सूक्ष्म अर्थशास्त्रात दुर्लक्षित केला तरी चालतो. परंतु स्थूल अर्थशास्त्रात त्यांच्यात सुक्त संबंध असतो. कारण हे शास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करीत असल्याने समग्रलक्षी पातळीवर त्यांचा विचार करावा लागतो. एकूण पुरवठ्यात जेव्हा काही बदल होतात तेव्हा मागणीवर त्यांचा होणारा परिणाम या शास्त्रांतून अभ्यासला जातो. तसे पाहता मागणी व पुरवठा हे स्वतंत्र घटक आहे. परंतु त्यांच्यांतला सुक्त संबंध उत्पन्नांच्या साहय्याने अभ्यासण्यांचे काम समग्रलक्षी अर्थशास्त्र करते.

उदा. काहीवेळेस जी माणसे उत्पादक म्हणून काम करतात तीच माणसे पुढे ग्राहक म्हणूनही भुमिका पार पाडत असतात. म्हणून या सर्वांचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते.

④ उत्पन्न हा दुवा :-
सूक्ष्म अर्थशास्त्रात मागणीतील बदलांचा संबंध किंमतीशी जोडला जातो. तर समग्रलक्षी अर्थशास्त्रात मागणीतील बदलांचा संबंध उत्पन्नाशी जोडला जातो. जसे की उत्पन्न वाढले की मागणी वाढते व उत्पन्न कमी झाले की मागणी कमी होते. म्हणून मागणी व पुरवठ्यात होणारे बदल हे उत्पन्नांमुळे होतात हे सांगण्यांचे काम हे शास्त्र करते.

⑤ एकूण मागणी :-
एकूण मागणी ही उपभोक्त्यांची, उत्पादकांची व शासनांची वस्तू व सेवांना असलेली मागणी या सर्वांची बेरीज करून मिळते. अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवांना असलेली मागणी स्वतंत्रपणे अभ्यासने कठीण असते. म्हणून ग्राहकांचे मागणीच्या दृष्टीने स्वतंत्रपणे गट पाडले जातात व त्यांचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्र करते.

⑥ एकूण पुरवठा -
एकूण पुरवठ्याबाबतही असेच म्हणता येते. की एका वस्तुंचा पुरवठा विचारात घेऊन समग्रलक्षी अर्थशास्त्र अभ्यास करत नाही. तर देशात उत्पादीत होणाऱ्या एकूण वस्तु व सेवांचा गट करून त्यांचा अभ्यास हे शास्त्र करते असे त्यांचे स्वरूप आहे.

⑦ समतोल :-
अर्थव्यवस्थेत एकूण मागणी = एकूण पुरवठा साधने, उत्पन्न = मागणी साधने, बचत = गुंतवणूक साधने, यांच्या सर्व समतोलांचा प्रयत्न समग्रलक्षी अर्थशास्त्र करते.

या प्रकारचे स्वरूप समग्रलक्षी अर्थशास्त्रांचे आहे. थोडक्यात समग्रलक्षी अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेतील अनेक घटक व त्यांच्या समस्या यांचा अभ्यास करते व त्यावर योग्य उपाय शासन करते.

2012 2011 2013 Act 2013

## * समग्रलक्षी अर्थशास्त्रांची व्याप्ती :-

समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती म्हणजे या ① शास्त्रात कोणकोणत्या विषयांचा अभ्यास होतो हे सांगणे होय. अर्थव्यवस्थेतील आर्थिक व्यवहारांची पातळी कशी ठरते? मागणी पुरवठ्यांचा समतोल कसा होतो? यांचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात होतो दुर्मिळ साधनांचा पर्याप्त वापर करून अमर्याद गरजा पूर्ण करण्यांचे शास्त्र म्हणून अर्थशास्त्राकडे पाहिले जाते. अर्थशास्त्र हे सामाजिक कल्याणांचे व आर्थिक विकासांचे शास्त्र असल्याने समग्रलक्षी अर्थशास्त्रात पुढील विषयांचा अभ्यास व्याप्ती म्हणून केला जातो ही व्याप्ती दोन भागात विभागली आहे.

अ) स्थूल आर्थिक घटक / सिद्धांत
ब) स्थूल आर्थिक धोरणे

या व्याप्तींचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे

### अ) स्थूल आर्थिक घटक / सिद्धांत :-

#### ① रोजगार आणि उत्पन्नविषयक सिद्धांत :-

उत्पन्न व रोजगार (विषयक सिद्धांत) हा समग्रलक्षी अर्थशास्त्राचा पाया मानला जातो. देशातील नैसर्गिक साधन सामग्री, तंत्रज्ञान, भांडवल व मनुष्यबळांचा महत्तम वापर करण्यांचा प्रयत्न समग्रलक्षी अर्थशास्त्रात केला जातो व त्यातून एकूण वस्तू व सेवांचे उत्पादन वाढविण्यांचा प्रयत्न केला जातो. देशातील बेकारी दूर करण्यांचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी उपाय योजले जातात. या सर्वांचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्र स्वतंत्रपणे उत्पन्नविषयक व रोजगारविषयक सिद्धांत मांडून करते.

#### ② उपभोग व गुंतवणूक विषयक सिद्धांत :-

अर्थव्यवस्थेत निर्माण झालेले उत्पन्न हे उपभोग्य वस्तू व भांडवली वस्तू खरेदी करण्यासाठी खर्च केले जाते. उपभोग्य वस्तूंवर किती उत्पन्न खर्च करावे?

तसेच उपभोगांची पातळी टिकविण्यासाठी कोणत्या उपाय-योजना कराव्यात? यासंबंधीचा अभ्यास उपभोग व गुंतवणूकविषयक सिद्धांतात केला जातो.

③ व्यापार चक्राबाबतचा सिद्धांत :-

अर्थ व्यवस्थेत जे चढ-उतार होतात, त्यांस व्यापार चक्रे म्हणतात. अर्थव्यवस्थेत व्यापारचक्रे का निर्माण होतात? आर्थिक तेजी-मंदीच्या काळात काय परिस्थिती असते? त्यांवर नियंत्रण कसे करता येते यासंबंधीचा संपूर्ण अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्र स्वतंत्र व्यापारचक्र विषयक सिद्धांत मांडून करते हीच त्यांची व्याप्ती आहे.

④ सर्वसाधारण किंमत पातळीबाबतचे सिद्धांत :-

स्थूल अर्थशास्त्रात सर्व वस्तु व सेवांची किंमत कशी निश्चित होते? यांचा अभ्यास केला जातो. किंमतीतील बदलांचा परिणाम हा मागणीवर तसेच पुरवठ्यांवर होत असतो आणि मागणीत अथवा पुरवठ्यांत बदल झाला तर त्यांचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो किंमती बदलतात म्हणून मागणी आणि पुरवठ्यांत समतोल साधने, वस्तुंची सर्वसाधारण किंमत ठेवणे यांसाठी हे शास्त्र समतोल साधन्यांसाठी सर्वसाधारण किंमत पातळीच्या सिद्धांत मांडून अभ्यास करते.

⑤ आर्थिक विकासांच्या सिद्धांत :-

स्थूल अर्थशास्त्रात आर्थिक विकासांच्या सिद्धांतांच्या अभ्यास केला जातो. देशांच्या अर्थव्यवस्थेतील वस्तु व सेवांची उत्पादन करण्यांची क्षमता वर्षानुवर्ष स्थीर आहे की वाढत आहे. या आर्थिक समस्येची सोडवणूक या विभागात केली जाते. वस्तु व सेवांच्या उत्पादन वाढीचा संबंध आर्थिक विकासांशी जोडला जातो. त्यासंदर्भात आर्थिक विकासांचा सिद्धांतरूपी अभ्यास स्थूल अर्थशास्त्राच्या या विभागात केला जातो.

⑥ आंतराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत :

समग्रलक्षी अर्थशास्त्रांच्या व्यापतील आयात-निर्यात, स्थिर व बदलते विनिमय दर व्यवहार तोल यांबाबतच्या माहितीचा समावेश होतो. समग्रलक्षी अर्थशास्त्र आंतराष्ट्रीय व्यापारांच्या सिद्धांत मांडून यांचा अभ्यास करते.

⑦ विभाजनांच्या स्थूल सिद्धांत :

उत्पादन प्रक्रियेत उत्पादक घटकांनी केलेल्या कार्यबद्दल त्यांना मोबदले दिले जातात. उदा. भूमीला खंड, श्रमाला वेतन / मजुरी, भांडवलाला व्याज, व संयोजकाला नफा हे मोबदले ठरविण्याचे कार्य सूक्ष्म अर्थशास्त्र करते परंतु राष्ट्रीय उत्पादनांचे समाजातील विविध गटांचे वाटे व त्यात होणारा बदल यांचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रातील विभाजनांचा स्थूल सिद्धांत या विभागात केला जातो.

## ब) स्थूल आर्थिक धोरणे :

राष्ट्राला उपयुक्त ठरणाऱ्या स्थूल आर्थिक धोरणांचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो. आर्थिक धोरण हे सरकार निश्चित करते त्यात पुढील धोरणांचा समावेश होतो.

① चलनविषयक धोरण :

सरकार (अथवा) देशांच्या मध्यवर्ती बँकेकडून चलनविषयक धोरण निश्चित केले जाते. देशात किंमत स्थैर्य निर्माण व्हावे, उत्पादनात वाढ, रोजगारात वाढ व आर्थिक विकास इ. उद्दिष्ट्यांचा विचार करून चलनविषयक धोरण निश्चित केले जाते. त्यांमध्ये पैशांचा पुरवठा वाढवितांना देशात भाववाढ होणार नाही यांची काळजी घ्यावी लागते. हा सर्व अभ्यास स्थूल अर्थशास्त्रातील चलनविषयक धोरणांत केला जातो.

② राजकोषीय धोरण :

राजकोषीय धोरणांला वित्तीय धोरण असेही -

म्हणतात. देशांतील शासनांकडून हे धोरण राबविले जाते. देशांत करप्रणाली कशी असावी? सार्वजनिक खर्चात कोणत्या बाबीवर भर दयावा? सार्वजनिक कर्ज कसे असावे. देशांच्या विकासासाठी तुटीचा अर्थ भरणा निर्माण करावा का या संबंधीचा अभ्यास हे शास्त्र राजकोषीय धोरणात करते.

③ आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण.

आर्थिक विकास व आंतरराष्ट्रीय व्यापारांचा जवळचा संबंध असतो. देशांच्या आर्थिक विकासांचे उद्दिष्ट साध्य होण्यांच्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय व्यापार धोरणांचा स्विकार केला जातो. आंतरराष्ट्रीय व्यापारांचे सिद्धांत, खुले व्यापार धोरण, संरक्षीत व्यापार धोरण व व्यापारांच्या अटी इ. चा अभ्यास यांमध्ये समाविष्ट होतो. आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण हा स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यास विषय आहे.

या प्रकारची व्याप्ती या शास्त्रांची होय अर्थात ही व्याप्ती परिपूर्ण होत नाही कारण अर्थव्यवस्थेत रोज नव्याने बदल होत असल्याने या शास्त्राच्या व्याप्तीत ही बदल होत आहे.

2012 2011 2013 * समग्रलक्षी अर्थशास्त्रांच्या मर्यादा / दोष :

आजच्या काळात समग्रलक्षी अर्थशास्त्र उपयुक्त व मार्गदर्शक जरी असले तरी या शास्त्रांवर काही मर्यादा पडतात त्यापुढीलप्रमाणे आहेत.

① वैयक्तीक घटकांकडे दुर्लक्ष.

स्थूल अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला जातो. पण वैयक्तीक घटकांकडे दुर्लक्ष केले जाते. पण अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटक हा महत्त्वाचा आहे त्यांला दुर्लक्षीत करून चालत नाही पण हे शास्त्र ते करते.

② मापनासंबंधी अडचण :-

स्थुल अर्थशास्त्रात बेरजा, समूह, समुच्चय विचारांत घेतले जातात परंतु समूह विचारात घेताना त्या समूहांतील घटक एकजिनसी असावे लागतात. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत असे समूह मिळत नाही त्यामुळे त्यांची बेरीज करणे कठिण असते.

③ सरासरी फसवी :-

स्थुल अर्थशास्त्रात राष्ट्रीय उत्पन्नांच्या साह्याने सरासरी काढली जाते. परंतु ही सरासरी फसवी असते.

उदा. राष्ट्रीय उत्पन्नांत 10% ने वाढ झाली अशी सरासरी काढली असेल तर त्यावेळी देशांतील सर्व लोकांचे दरडोई उत्पन्न 10% ने वाढले असा निष्कर्ष निघतो. परंतु तो प्रत्यक्षात चुकीचा आहे.

④ वैयक्तीक निष्कर्ष अर्थव्यवस्थेस अयोग्य :-

वैयक्तीक (अथवा लहान) समूहाचे निष्कर्ष संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी लागू होत नाही. काही गोष्टी व्यक्तीच्या दृष्टीने अथवा समूहांच्या दृष्टीने हितांच्या असल्या तरी त्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हानीकारक असु शकतात. उदा. एका व्यक्तीने बचत करणे चांगले आहे. परंतु संपूर्ण समाजाने बचत करणे अयोग्य आहे हा दोष आहे.

⑤ समाजरचनेकडे दुर्लक्ष

अर्थव्यवस्थेत अनेक वर्ग दिसून येतात, जसे की - भांडवलदार वर्ग, शेतकरी वर्ग, गरीब व श्रीमंत वर्ग इ. यांचा स्वतंत्रपणे विचार या शास्त्रात होत नाही. सामान्य किंमत पातळीतील बदलांचे या वर्गावर वेगवेगळे परिणाम होतात. काहींना फायदा तर काहींना तोटा होतो. परंतु हे शास्त्र या समाज रचनेकडे दुर्लक्ष करते.

### ⑥ सर्वसामान्य किंमत पातळी सदोष आहे :-

सर्वसामान्य किंमत पातळीचा अभ्यास करताना देशांतील सर्व वस्तु व सेवांच्या किंमतीचा एकत्रीत विचार केला जातो. त्यांमध्ये ठोक किंमत, किरकोळ किंमत तसेच उत्पादक घटकांच्या किंमती इ. चा समावेश होतो. यांत काही किंमती ह्या वाढणाऱ्या तर काही स्थीर असतात. त्यामुळे सर्वसामान्य किंमत पातळीवरून अर्थव्यवस्थेतील किंमत बदलांची कल्पना येत नाही. या प्रकारचे दोष अथवा मर्यादा स्थूल अर्थशास्त्रात दिसतात. तरी ही अर्थव्यवस्थेच्या अभ्यासासाठी हे शास्त्र उपयुक्त आहे.

* * * * *

# सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र यांमधील फरक

**(Difference Between Micro Economics and Macro Economics)**

जर्मन अर्थशास्त्रज्ञ प्रा. रॅग्नर फ्रिश यांनी सन 1933 मध्ये अर्थशास्त्राच्या अभ्यासाविषयीची विभागणी सूक्ष्म अर्थशास्त्र व समग्रलक्षी अर्थशास्त्र अशा दोन शाखांमध्ये केलेली आहे. अर्थशास्त्राच्या या दोन्ही शाखा परस्पर पर्यायी नसून परस्परपूरक आणि परस्परावलंबी आहेत. त्यामुळे या दोन्ही शाखांमध्ये अर्थशास्त्राच्या अभ्यासविषयाची तंतोतंत किंवा काटेकोरपणे विभागणी करता येत नाही.

पुढील मुद्द्यांच्या आधारे सूक्ष्मलक्षी व समग्रलक्षी अर्थशास्त्रातील फरक स्पष्ट करता येईल.

| | आधार | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र | समग्रलक्षी अर्थशास्त्र |
|---|---|---|---|
| (1) | अर्थ | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राला इंग्रजीत 'Micro Economics' असे संबोधतात. Micro या शब्दाची उत्पत्ती Mikros या ग्रीक शब्दापासून झालेली आहे. Micro या शब्दाचा अर्थ इंग्रजीत small व मराठीत 'लहान' असा होतो. सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे अर्थव्यवस्थेच्या लहानातल्या लहान भागाचे भागश: विवेचन करणारी अर्थशास्त्राची शाखा होय. | समग्रलक्षी अर्थशास्त्राला इंग्रजीत 'Macro Economics' असे संबोधतात. Macro या शब्दाची उत्पत्ती Makros या ग्रीक शब्दापासून झालेली आहे. Makros या शब्दाचा इंग्रजीत अर्थ Aggregate किंवा Large आणि मराठीत 'मोठा' किंवा समुच्चय असा होतो. समग्रलक्षी अर्थशास्त्र म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेचा समुच्चयात्मक पातळीवर केला जाणारा अभ्यास होय. |
| (2) | व्याख्या | "विशिष्ट उद्योगसंस्था, विशिष्ट कुटुंब, वैयक्तिक किमती, वेतन, उत्पन्न, वैयक्तिक उद्योगधंदे व विशिष्ट वस्तूचा अभ्यास करणारी अर्थशास्त्राची शाखा म्हणजे 'सूक्ष्म अर्थशास्त्र' होय." **– प्रा. के. ई. बोल्डिंग** | "समग्रलक्षी अर्थशास्त्र हे वैयक्तिक घटकांचा विचार करत नाही तर त्यांच्या समुच्चयाचा विचार करते. व्यक्तिगत उत्पन्नाऐवजी राष्ट्रीय उत्पन्न, व्यक्तिगत किमतीऐवजी सर्वसाधारण किंमतपातळी, व्यक्तिगत उत्पादनाऐवजी राष्ट्रीय उत्पादनाची चर्चा करते." **– प्रा. के. ई. बोल्डिंग** |
| (3) | वापर | सूक्ष्म अर्थशास्त्राचा वापर प्राचीन काळापासून केला जातो. सनातनवादी व नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी सूक्ष्म आर्थिक विश्लेषण पद्धतीचा पुरस्कार केलेला आहे. ॲडम स्मिथ यांनी सूक्ष्म आर्थिक विश्लेषण पद्धतीचे समर्थन केलेले आहे. | समग्रलक्षी अर्थशास्त्राचा वापर जागतिक मंदीनंतर मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. जे. एम. केन्स यांनी समग्रलक्षी विवेचन पद्धतीचे समर्थन केलेले आहे. |

(क्रमश:)

| | आधार | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र | समग्रलक्षी अर्थशास्त्र |
|---|---|---|---|
| (4) | अभ्यासाचे परिमाण | सूक्ष्म अर्थशास्त्रात एकाचा, वैयक्तिकाचा किंवा विशिष्टाचा व्यक्तिगत पातळीवर अभ्यास केला जातो. उदाहरणार्थ, विशिष्ट उद्योगसंस्था, विशिष्ट कुटुंब, वैयक्तिक उत्पन्न, वैयक्तिक उद्योगधंदा. | समग्रलक्षी अर्थशास्त्रात एकूणाचा, समुच्चयाचा, सरासरीचा किंवा बेरजेचा अभ्यास केला जातो. उदा., एकूण रोजगार, एकूण बचत, राष्ट्रीय उत्पन्न, सर्वसाधारण किंमतपातळी. |
| (5) | व्याप्ती | सूक्ष्म अर्थशास्त्राच्या व्याप्तीत वस्तूची किंमतनिश्चिती, उत्पादन घटकांची किंमतनिश्चिती आणि आर्थिक कल्याण या अभ्यासविषयांचा समावेश होतो. | समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या व्याप्तीत उत्पन्न व रोजगार, सर्वसामान्य किंमतपातळी, आर्थिक विकासाचे सिद्धान्त, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धान्त, विभाजनाचे समग्रलक्षी सिद्धान्त, आर्थिक धोरण या अभ्यासविषयांचा समावेश होतो. |
| (6) | व्यक्तिगत विरुद्ध समग्र | सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक घटकांचा व्यक्तिगत पातळीवर विचार केला जातो. व्यक्तिगत पातळीवर जे खरे असते ते जसेच्या तसे लागू केले जाते. उदा., व्यक्तिगत पातळीवर बचत हा सद्‌गुण आहे. | समग्रलक्षी अर्थशास्त्रामध्ये समुच्चयाचा किंवा संपूर्णाचा देशाच्या पातळीवर विचार केला जातो. व्यक्तिगत पातळीवर जे खरे असते ते समाजाच्या पातळीवर जसेच्या तसे लागू केले जात नाही. उदा., व्यक्तिगत पातळीवर बचत हा सद्‌गुण असला तरी समाजाच्या पातळीवर तो दुर्गुण होऊ शकतो. |
| (7) | स्वावलंबन व परस्परावलंबन | सूक्ष्म अर्थशास्त्रात प्रत्येक घटक हा स्वतंत्र असतो आणि तो स्वयंपूर्ण असतो. एका घटकातील बदलाचा दुसऱ्या घटकावर परिणाम होत नाही. | समग्रलक्षी अर्थशास्त्रात एक घटक दुसऱ्या घटकावर अवलंबून असतो. एका घटकातील बदलाचा दुसऱ्या घटकावर प्रभाव पडतो. उदा., व्यक्तीचे उत्पन्न बदलल्यास उपभोग खर्चात, मागणीत व किंमतपातळीत बदल होतो. |

(क्रमशः)

| | आधार | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र | समग्रलक्षी अर्थशास्त्र |
|---|---|---|---|
| (8) | **अभ्यासाचा केंद्रबिंदू** | किंमतयंत्रणा हा सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. किंमत बदलल्यास मागणी-पुरवठ्याच्या संतुलनात बदल होतो. | 'उत्पन्न' हा समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. उत्पन्नातील बदलाच्या साहाय्याने मागणी-पुरवठ्यातील संतुलन स्पष्ट केले जाते. |
| (9) | **मागणी व पुरवठा संबंध** | सूक्ष्म अर्थशास्त्रात मागणी व पुरवठा हे दोन्ही घटक स्वतंत्र असतात. मागणीतील बदलाचा पुरवठ्यावर व पुरवठ्यातील बदलाचा मागणीवर परिणाम होत नाही. | समग्रलक्षी अर्थशास्त्रात समग्र मागणी व समग्र पुरवठा एकमेकांवर अवलंबून असतात. समग्रलक्षी अर्थशास्त्रात मागणी व पुरवठ्याचे पृथक्करण करून त्यांच्यातील बदलांचा अभ्यास केला जातो. |
| (10) | **साधनसामग्री वितरण** | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात साधनसामग्री दिलेली आहे असे गृहीत मानून अर्थव्यवस्थेची अनेक क्षेत्रात विभागणी केली जाते. | समग्रलक्षी अर्थशास्त्रात साधनसामग्रीचे वितरण उपभोग्य वस्तू व भांडवली क्षेत्र अशा दोन विभागांत केले जाते. |
| (11) | **सीमांत विश्लेषण** | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात सीमांत विश्लेषणाचा वापर करून विविध नियम व सिद्धान्तांची मांडणी केलेली आहे. उदाहरणार्थ, घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धान्त, विभाजनाचा सीमांत उत्पादकता सिद्धान्त. | समग्रलक्षी अर्थशास्त्रात सिद्धान्ताचे स्पष्टीकरण करताना कालबाह्य ठरणाऱ्या सीमांत विश्लेषणाचा त्याग करण्यात आलेला आहे. |
| (12) | **व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ** | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र व्यक्तिनिष्ठ व वस्तुनिष्ठ असून सूक्ष्म अर्थशास्त्र मृत होणाऱ्या मानवाचा अभ्यास करते. | समग्रलक्षी अर्थशास्त्र समाजनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ असून समग्रलक्षी अर्थशास्त्र अमर राहणाऱ्या समाजाचा अभ्यास करते. |
| (13) | **स्थितिशील व गतिशील** | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र हे स्थितिशील असून सूक्ष्म अर्थशास्त्रातील नियम किंवा सिद्धान्त विशिष्ट परिस्थितीत लागू होतात. | समग्रलक्षी अर्थशास्त्र गतिशील आहे. समग्रलक्षी अर्थशास्त्रात बदलत्या परिस्थितीचे विवेचन केले जाते. समग्रलक्षी अर्थशास्त्रात नियम किंवा सिद्धान्त सर्वसाधारण परिस्थितीत लागू होतात. |

**(क्रमशः)**

| | आधार | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र | समग्रलक्षी अर्थशास्त्र |
|---|---|---|---|
| (14) | **वास्तव व चलनी परिमाणे** | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात नियम किंवा सिद्धान्ताचे स्पष्टीकरण करताना वास्तव परिमाणे वापरली जातात. | समग्रलक्षी अर्थशास्त्रात चलनी परिमाणाचा वापर केला जातो. वस्तू व सेवांच्या किमती पैशात व्यक्त केल्या जातात. |
| (15) | **सरकारी धोरण** | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात सरकारच्या निर्हस्तक्षेप धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. तत्त्व व सिद्धान्ताची जास्त चर्चा केली जाते. सरकारी धोरण ठरविण्याच्या दृष्टीने सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र निरुपयोगी ठरते. | समग्रलक्षी अर्थशास्त्रात सरकारी हस्तक्षेपाला महत्त्व दिलेले आहे. समग्रलक्षी अर्थशास्त्रात तत्त्व व सिद्धान्ताची उपयुक्तता विचारात घेतली जाते. उदा., राजकोषीय धोरण, अंदाजपत्रकीय धोरण, सरकारी धोरण ठरविण्यास समग्रलक्षी अर्थशास्त्र उपयुक्त ठरते. |
| (16) | **रोजगार पातळी** | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात विविध क्षेत्रात रोजगार पातळी कशी ठरते. वेतनाचे दर कसे निश्चित होतात याचे विवेचन दिले जाते. | समग्रलक्षी अर्थशास्त्रात रोजगार पातळीत चढ-उतार कसे होतात, मजुरीचे दर ठरविताना कोणकोणत्या घटकांचा विचार केला जातो याचे विवेचन दिले जाते. |
| (17) | **संकुचित व व्यापक** | सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र हे समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या तुलनेत संकुचित आहे. संपूर्ण जंगलाऐवजी त्यातील एखाद्या झाडाचा अभ्यास केला जातो. | समग्रलक्षी अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्राच्या तुलनेत व्यापक आहे. यात संपूर्ण जंगलाचे परीक्षण केले जाते. |
| (18) | **स्वरूप** | अर्थव्यवस्थेचे एखाद्या किड्याच्या दृष्टिक्षेपात येणारे दृश्य असे सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राचे स्वरूप आहे. | हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यासविषय आहे. एकूण अर्थव्यवस्थेचे एखाद्या पक्ष्याच्या दृष्टिक्षेपात येणारे दृश्य असे स्थूल अर्थशास्त्राचे स्वरूप असते. |

## स्वाध्याय

- **खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा.**
  1. स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या करा.
  2. स्थूल अर्थशास्त्राची दोन वैशिष्ट्ये सांगा.
  3. स्थूल अर्थशास्त्राचे दोन महत्त्व सांगा.
  4. स्थूल अर्थशास्त्राच्या दोन मर्यादा सांगा.
- **खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**
  1. स्थूल अर्थशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करा.
  2. स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.
- **खालील प्रश्नांची प्रत्येकी 100 शब्दांत उत्तरे लिहा.**
  1. स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व स्पष्ट करा.
  2. स्थूल अर्थशास्त्राच्या मर्यादा स्पष्ट करा.
  3. स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.
- **खालील प्रश्नांची प्रत्येकी 200 शब्दांत उत्तरे लिहा.**
  1. स्थूल अर्थशास्त्र म्हणजे काय ? स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.
  2. स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्व आणि मर्यादा स्पष्ट करा.